# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १०/एनजीपी/नवीन अभ्यासक्रम/मान्यता/२०१९/660

दिनांक : 1 JUL 2019

प्रति,

प्राचार्य,

पुना डिस्ट्रीक्ट एज्युकेशन असोसिएशनचे,

सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी,

सासवड, ता. पुरदंर,

जि. पुणे-४१२३०१.

[६३७२]

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत कायम विना-अनुदान तत्त्वावर औषधनिमार्णशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत.

संदर्भ :१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१९-२०/१-४२५९४४००४८/२०१९/ईओए , दि. २५ एप्रिल, २०१९.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. मान्यता-२०१९/(प्र.क्र.९७/१९)तांशि-५, दि. २० जून, २०१९.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन औषधनिमार्णशास्त्र पदविका अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | डी.फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र “अ” व “ब” या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ३.०० लाख खाते क्र. ५३०४०१०३७६४२३१७, दि.२६.६.२०१९ अन्वयें, कार्पोरेशन बँक, शाखा- सासवड, येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन औषधनिमार्णशास्त्र पदविका अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

VKM Keep Record and TNA

Patil 12/7/019

Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Inward Letter No: 259
Date: 12/7/19

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमांक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था व संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करतील.

३ प्रस्तुत मान्यता ही संबंधित अभ्यासक्रमांस महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे संलग्नतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सबब आपल्या संस्थेतील अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता प्राप्त करणे अनिवार्य असून, मंडळाच्या संलग्नतेशिवाय संस्थेमध्ये कोणतेही प्रवेश करण्यात येऊ नयेत.

४. संस्थेने प्रवेशासाठी औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांची [D. Pharmacy] तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
३. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई
४. निवड नस्ती.